सकाळ
नांदेड, शुक्रवार,
९ डिसेंबर २०१६

# 'नूतन'ला सहा पारितोषिके

**सेलू, ता. ८ (बातमीदार) :** नांदेड स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी यांच्या वतीने आयोजित अविष्कार - २०१६ स्पर्धेत नूतन महाविद्यालयाने एकूण सहा पारितोषिके प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले आहे. अविष्कार - २०१६ स्पर्धेत नूतन शिक्षण संस्था संचलित नूतन महाविद्यालयाच्या शंतनू हादगावकर व विद्या जोशी यांनी कृषी विषायात प्रथम क्रमांक पटकाविला. मेडिकल फार्मसीमध्ये अश्विनी वैद्य, प्रतीक्षा पवारने प्रथमक क्रमांक मिळविला. याच विषयात स्वाती ताठे, मनाली देशमुख द्वितीय क्रमांक तर रुपाली हारकळ, अश्विनी धाबे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी या विभागात उबेद शेख, मेघना जोशी यांनी दुसरा क्रमांक पटकाविला. सूक्ष्मजीवशास्त्र विषयाचे प्रा. अमित कुलकर्णी यांनी शिक्षक गटातून कृषी विभागात प्रथम क्रमांक प्राप्त केला. यशस्वी विद्यार्थी व सहभाग घेतलेल्या प्राध्यापकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया, उपाध्यक्ष ॲड. व्ही. एस. खारकर, चिटणीस डी. के. देशपांडे, सहचिटणीस डॉ. विनायक कोठेकर, जयप्रकाश बिहाणी, प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, परीवेक्षक एल. एच. काळे, एच. एस. व्ही. सी. विभागाचे समन्वयक प्रा. दयानंद जामगे, अधीक्षक यू. आर. कदम, एम. एस. शिंदे, यू. एस. पानपट्टे , यू. सी. राठोड, डॉ. वसंत पांचाळ, आर. एम. खाडप, एस. एस. दंडवते, पी. एस. खरात, के. एस. निरालवाड, पी. आर. कंठाळे यांनी कौतुक केले.